श्री

दिनांकः

अलॉटमेंट लेटर

प्रती,

___________________

____________________

____________________

विषय : मौजे- मखमलाबाद या गावचे शिवारातील बिनशेती मिळकत यासी सर्व्हे नं.45/1/ब/1, यासी प्लॉट नं.4/5 यासी एकुण क्षेत्र 1177.30 चौ.मी. यावरील ''साई अरविंद ''या प्रकल्पामधील सदनिका /शॉप क्रं.________यांचे अलॉटमेंट बाबत.

महोदय,

1. आम्ही मौजे- मखमलाबाद या गावचे शिवारातील बिनशेती मिळकत यासी सर्व्हे नं.45/1/ब/1, यासी प्लॉट नं.4/5 यासी एकुण क्षेत्र 1177.30 चौ.मी. यावर ''साई अरविंद '' नावाने प्रकल्प राबवीत असुन सदरहु प्रकल्पाचे ठिकाणी तुम्ही प्रत्यक्ष येऊन प्रकल्पाची पाहणी केलेली असुन त्यानुसार तुम्ही सदरहु प्रकल्पामधील खालील नमुद मिळकतीचे अलॉटमेंट संदर्भाने विंनती केलेली आहे त्यानुसार तुम्हास सर्व अटी व शर्ती तसेच प्रकल्पाची संपुर्ण माहीती दिलेली असुन त्यासर्व बाबी तुम्ही मान्य व केलेल्या असल्याने तुमचे लाभात सदरचे अलॉटमेंट लेटर देण्यात आलले आहे.

2. तुम्ही दिलेल्या माहीतीनुसार अलॉटमेंट करण्यात आलेल्या व्यक्तींची नावे व तुम्हास अलॉट केलेल्या सदनिकेचा/शॉपचा तपशील.

| | | |
|---|---|---|
| ए. | नाव. ________ ________ | |
| बी. | पत्ता- ________ ________ | |
| सी. | पॅन ________ ________ | |
| डी. | अलॉट सदनिकेचा /शॉपचा क्रं. ________ | |
| इ. | क्षेत्र | |
| एफ. | पार्कींग | |
| जी. | मजला | |
| एच. | विंग | |
| आय. | प्रकल्पाचे नाव | साई अरविंद |
| जे. | शिवार | मखमलाबाद |
| के. | सर्व्हे नं. | 45/1/ब/1 |
| एल. | प्लॉट नं. | 4/5 |
| एम. | सि.स.नं. | |

एन. किंमत

ओ. रेरा नोंदणी क्रमांक -

3. वर नमुद सदनिका/शॉप तुम्हास किंमत रु.__________/- ठरवुन अलॉट करण्यात आलेली असुन सदनिके/शॉपकरीता पार्कींग क्षेत्राची किंमत _________ _________ कायम करण्यात आलेली आहे अशी एकुण किंमत रक्कम रु. _________ _________ _________ मात्र कायम करण्यात आलेली आहे.

सदर किंमतीपैकी रक्कम रु. _________ _________ मात्र तुम्ही आम्हास _________ _________ बँक येथील चेक क्रं. _________ _________ दि. _________ रोजीचे चेक स्वरुपात विसार/आगाऊ रक्कम म्हणुन अदा केलेली आहे त्याबाबत कोणतीही तक्रार नाही. (एकुण किंमतीच्या 10% रक्कम)

4. सदर किंमतीचे रक्कमेमध्ये खालील बाबींच्या रक्कमा समाविष्ठ नसुन त्या तुम्ही किंमतीव्यतीरीक्त वेगळया दयावयाच्या आहेत हि बाब तुम्ही मान्य व कबुल केलेली आहे.

अ. मिळकतीसंदर्भाने दस्त नोंदणीकामी होणारा स्टॅम्प डयुटी, नोंदणी फी व इतर खर्च

ब. नळ कनेक्शनचा खर्च

क. विदयुत कनेक्शनचा खर्च

ड. सोसायटी किंवा संघ नोदंणी खर्च,प्रवेश फी व इतर खर्च

इ. बांधकामासंदर्भाने व चालु कामासंदर्भाने लागु असलेले सर्व कर जसे की,जी.एस.टी व इतर कर ,उपकर तसेच भविष्यात बांधकाम चालु असे पावेतो व त्यानंतरही जे कोणतेही कर लागु होतील ते कर

5. सदरचे जमिन मिळकतीसदंर्भाने लिहुन देणार यांचे मालकी हक्क दर्शविणारी व मिळकतीचे टायटलसंदर्भाने असलेली संपुर्ण कागदपत्रे जसे की, 7/12 उतारे, नोंदी,खरेदीखते व इतर दस्तऐवजे तसेच लिहुन देणार यांनी नियुक्त केलेल्या वास्तुशास्त्रज्ञ आणि स्थापत्य अभियंता यांनी तयार केलेले आराखडे, इमारत नकाशे व इतर नकाशे तसेच स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम 2016 या मध्ये नमुद कागदपत्रे यांच्या प्रती लिहुन घेणार यांना निरीक्षणासाठी व अवलोकणाकामी या पुर्वीच दिलेल्या आहेत.त्यानुसार लिहुन घेणार यांनी सदरील कागदपत्रांची तपासणी लिहून घेणार यांनी केलेली असून लिहुन घेणार यांची खात्री पटलेनंतरच लिहुन घेणार यांनी मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.तसेच सदरची सर्व कागदपत्रे सदैव प्रकल्पाची ठिकाणी उपलब्ध ठेवलेली आहेत.तसेच इमारत नकाशा हा नाशिक महानगर पालिका नाशिक यांनी पत्र क्रं.एलएनडी/बीपी/नाशिक /डिसीआर /1079/2019, दि.22/05/2019 अन्वये मंजुर केलेला आहे.सदर इमारत नकाशा मध्ये फेरबदल करणे,वाढीव बांधकामाकामी तुम्ही आम्हास संमती दिलेली आहे.

6. सदरहु सदनिकेची /शॉपची व पार्कींग क्षेत्राची एकुण किंमत रक्कम रु.______/- (अक्षरी रु._________________मात्र)कायम करण्यात आलेली असुन सदरहु रक्कमेपैकी रक्कम रु.____/-(अक्षरी रु.___ __ __________ मात्र) (एकुण किंमतीच्या 10% रक्कम)तुम्ही आम्हास ________ ________ बँक येथील चेक क्रं. ________ दि. __/___/20___ रोजीचे चेक स्वरुपात विसार/आगाऊ रक्कम म्हणुन अदा केलेली आहे त्याबाबत कोणतीही तक्रार नाही.त्यानुसार शिल्लक व उर्वरीत किंमतची रक्कम रु. ________________/- तुम्ही आम्हास टप्या-टप्याने अदा करण्याचे मान्य व कबुल केलेले आहे.सदर सर्व टप्पे तुम्हास खालील प्रमाणे आखुन दिलेले आहेत.

| अ. क्रं. | तपशील | रक्कमेची टक्केवारी |
|---|---|---|
| 01. | बुकींग/ अलॉटमेंटचे वेळी | 10% |
| 02. | सदरचा करारनामा नोंदविल्याचे दिनांकापासुन 10 दिवसाचे आत | 20% |
| 03. | इमारतीचे प्लिंथचे बांधकाम पुर्ण झालेपासुन 10 दिवसाचे आत | 10% |
| 04. | इमारतीचे पहिल्या स्लॅबचे बांधकाम पुर्ण झालेपासुन 10 दिवसाचे आत | 10% |
| 05. | इमारतीचे दुस-या स्लॅबचे बांधकाम पुर्ण झालेपासुन 10 दिवसाचे आत | 10% |
| 06. | इमारतीचे तिस-या स्लॅबचे बांधकाम पुर्ण झालेपासुन 10 दिवसाचे आत | 05% |
| 07. | इमारतीचे चौथ्या स्लॅबचे बांधकाम पुर्ण झालेपासुन 10 दिवसाचे आत | 05% |
| 08. | इमारतीचे पाचव्या स्लॅबचे बांधकाम पुर्ण झालेपासुन 10 दिवसाचे आत | 05% |
| 09. | इमारतीचे विट बांधकाम काम पुर्ण झालेपासुन 10 दिवसाचे आत | 05% |
| 10. | सदनिका /दुकान/वेश्म ज्या मजल्यावर आहे त्या मजल्या वरील अतंर्गत गिलावा, स्वच्छता विषयक जुळण्या,जिने याचे काम पुर्ण झालेपासुन 10 दिवसाचे आत | 05% |
| 11. | उक्त इमारतीचे नळकाम,बाहेरील गिलावा, गच्चीचे काम पुर्ण झालेपासुन 10 दिवसाचे आत | 05% |
| 12. | इमारतीचे उव्दाहन,पाण्याचे पंप, विदयुत जोडणी,अंगभुत क्षेत्राची फरसबंदी व इतर कामे पुर्ण झालेपासुन 10 दिवसाचे आत | 05% |

| | | |
|---|---|---|
| 13. | इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त होवुन कब्जा लिहुन घेणार यांनी स्विकारण्या संदर्भाने लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना लेखी कळविल्याचे  दिनांकापासुन 10 दिवसाचे आत | 05% |
| | एकुण : | 100% |

7.     सदर रक्कमा वर नमुद केल्यानुसार वेळचेवेळी तुम्ही आम्हास अदा करावयाची आहे हि महत्वाची अट व शर्त आहे.जर सदर रक्कमा तुम्ही आम्हास अदा करण्यास विलंब झाल्यास, सदर अलॉटमेट रदद करण्याचे आमचे हक्कास बाधा न येता सदर देय रक्कमेस विलंबाचे संपुर्ण कालावधीकरीता _____% द.सा.द.शे.व्याज आकरण्यात येइल व त्यानुसार तुम्ही व्याजासह रक्कमा आम्हास अदा करावयाच्या आहेत.

8.     वर नमुद केल्यानुसार तुम्ही आम्हास रक्कमा देण्यास विलंब केल्यास विलबांचे संदर्भाने व्याजासह रक्कम देण्याचे आम्ही तुम्हास कळविल्याचे दिनांकापासुन 15 दिवसाचे आत तुम्ही सदर देय रक्कम व व्याजाची रक्कम अदा न केल्यास सदर अलॉटमेंट एकतर्फे व आपोआप रदद होइल व त्यानंतर सदर मिळकत कोणत्याही त्रयस्थ खरेदीदारास अलॉट करण्यात येइल त्यावर तुम्हास हरकत घेण्याचा कोणताही हक्क राहणार नाही.तसेच अशावेळी तुमची अलॉटमेंट रदद झाल्यास त्यावेळे पावेतो तुमचे कडुन आम्हास प्राप्त झालेल्या संपुर्ण रक्कमेमधुन 10% रक्कम कपात करुन उर्वरीत रक्कम बिनव्याजी परत करण्यात येइल तसेच करापोटी तुम्ही कोणतीही रक्कम दिलेली असल्यास व ती आम्ही शासनजमा केलेली असल्यास अगर करावी लागत असल्यास ती तुम्हास परत करण्यात येणार नाही अगर तुमचे वतीने आम्ही कोणताही कर भरलेला असल्यास ती रक्कम देखील कपात करुन उर्वरीत रक्कम तुम्हास परत करण्यात येइल.

9.     सदर अलॉटमेंट लेटरचे दिनांकापासुन 30 दिवसाचे आत तुम्ही सदर अलॉटेड मिळकतीसंदर्भाने करारनामा हा दस्त नोंदविण्याची संपुर्ण कार्यवाही तुमचे पदर खर्चाने पुर्ण करुन दस्त नोंदणी करुन देण्याचे मान्य व कबुल केलेले आहे.

10.     सदर तुम्हास अलॉट केलेल्या मिळकतीचे संदर्भाने तुम्ही आम्हास संपुर्ण किंमतीची रक्कम व इतर देय रक्कमा अदा केल्याशिवाय सदर मिळकत तुम्ही त्रयस्थ इसमास विक्री ,हस्तांतर ,तबदील करण्याचे ,गहाण देण्याचे तुम्हास कोणतेही हक्क व अधिकार राहणार नाही.

11. सदरहु तुम्हास अलॉट करण्यात आलेल्या मिळकतीचा कब्जा तुम्हास दि.___________ पावेतो देण्यात येइल मात्र सदर कब्जा देण्यास युध्द ,नागरी विक्षोभ किंवा दैवी कृती अगर शासनाची ,न्यायालयाची आणि /किंवा इतर सार्वजनिक अथवा सक्षम प्राधिकरणाची कोणतीही नोटीस,आदेश,नियम, अधिसुचना या कारणांमुळे अगर,शासन/प्राधिकारणा कडुन कोणतीही परवाणगी मिळण्यास विलंब या कारणामुळे अगर तुमचे कसुरीमुळे विलंब होऊ शकतो हि बाब तुम्ही मान्य व कबुल केलेली आहे.

12. सदर अलॉटमेंट पोटी तुम्ही आम्हास दिलेला आगाऊ रक्कमेचा चेक अनादरीत झाल्यास सदरचे अलॉट मेंट आपोआप रदद होइल त्याकामी तुम्हास कळविण्याची आवश्यक्ता राहणार नाही.

13 सदर वर नमुद बाबी तुम्ही मान्य व कबुल केलेल्या असुन त्याचे मान्यतेकरीता सदर अलॉट मेंट लेटर वर सही करुन दिलेली आहे.

1. सौ.तापाबाई अरविंद फुलपगारे
2. श्री.अरविंद गेणु उर्फे सेनु फुलपगारे
3. श्री. प्रकाश अरविंद फुलपगारे
4. श्री. पंडित अरविंद फुलपगारे
5. श्री. संतोष अरविंद फुलपगारे
6. आनंद बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स
भागीदारी संस्था
तर्फे भागीदार
श्री. प्रदिपलाल सुभाषलाल बुरड
अ.नं. 6 हे स्वतःकरीता व अ.नं. 1 ते 5
यांचे जनरल मुखत्यार व मिळकत
विकसनकर्ता म्हणुन

____________
लिहून देणार/
विक्रेता/प्रवर्तक